नि.फौ.के. नं. ६१/२०२४
**महाराष्ट्र शासन वि. अविनाश गुरव**
**निशाण क्र. १७**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव –** आदित्य बळीराम भेरे,

**वय –** २४ वर्षे, **व्यवसाय** – शेती,

**राहणार –** बोंडे, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती गुरुपादगोळ यांचेकडून</u> –**

०१. मी वरील पत्त्यावर माझे आई–वडील व दोन भाऊ – गणेश व विघ्नेश यांच्यासोबत राहतो. दिनांक १२/०५/२०२४ रोजी मिटींग होती. वाडीमध्ये श्री. सत्यनारायणाची पुजा झाली होती. त्याच्या खर्चाबाबत सदरची मिटींग आयोजीत केली होती. सदर मिटींगमध्ये वाडीतील २० ते २५ लोक हजर होते. सगळयांची नावे मला आता आठवत नाहीत. सदरची मिटींग रात्री ०९:०० वाजताच्या दरम्यान होती. सदर मिटींगमध्ये पुजेच्या खर्चाबाबत बोलणे झाले होते. पुढे काही झालेच नाही. तक्रार वगैरे काहीही झालेली नव्हती. मला कोणतीही दुखापत झालेली नव्हती. असे काही घडले नाही की, मी तक्रार दाखल केली होती. *(साक्षीदारास घटनेचा प्राथमिक अहवाल दाखविण्यात आला). त्यावर माझी सही आहे. सदर सही मी कोठे केली होती, हे मला आता आठवत नाही. (**<u>सही पुरत्या भागास पुढील निशाणी क्रमांक १८</u>** देण्यात येते). (साक्षीदारास तक्रार दाखविण्यात आली). त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. (**<u>सही पुरत्या भागास पुढील निशाणी क्रमांक १९</u>** देण्यात येते).* न्यायालयात हजर असलेल्या आरोपीस मी ओळखतो. त्याचे नाव अविनाश गुरव असे आहे.

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने विशेष सहा. सरकारी***

*अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)*

०२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १२/०५/२०२४ रोजी आमच्या वाडीत श्री. सत्यनारायणाची पुजा झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर दिनांक १३/०५/२०२४ रोजी रात्री १०:३० वाजताच्या दरम्यान आमच्या वाडीत यशवंत सोमा गुडेकर यांच्या अंगणात मिटींग बसली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिटींगला मी, विघ्नेश भेरे, गणेश भेरे, दिपक भेरे व माझे वडील बळीराम भेरे असे उपस्थीत होतो. हे मला माहिती नाही की, मंडळाचा उपाध्यक्ष – कल्पेश गुरव हा मिटींगला आला नसल्याने त्याला बोलाविण्यासाठी लोक सांगत होते, अगर कसे. हे मला माहिती नाही की, त्यामुळे रात्री १२:३० वाजताच्या दरम्यान माझा भाऊ विघ्नेश याने अविनाश गुरव याला कल्पेश गुरव कोठे आहे, अशी विचारणा केली असता, त्याचा राग येवुन त्याने कल्पेशचा भाऊ – सिध्देश गुरव याला कल्पेश गुरव व त्याचे वडील – दत्ताराम गुरव यांना बोलाव, असे म्हणुन पुढे त्याने अश्लील शिवीगाळी केली होती.

०३. *(साक्षीदारास तक्रारी जबाबातील **चिन्हांकित भाग – अ कडील मजकुर वाचुन** दाखविण्यात आला). सदरचा मजकुर बरोबर नाही. तो तसा का नमुद केला आहे, याचे काही कारण मला सांगता येणार नाही.* हे मला माहिती नाही की, सदर घटनास्थळी पोलीस पंचनाम्यासाठी आले होते, अगर कसे. हे म्हणणे खरे नाही की, मीच पोलीसांना त्यावेळी घटनास्थळ दाखविले होते. *(साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला). त्यावर घटनास्थळ दाखविणार सही म्हणुन माझी अनुक्रमांक ०२ वर सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. (सही पुरत्या भागास **पुढील निशाणी क्रमांक २०** देण्यात येते).*

०४. *(साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली). अनुक्रमांक ०१ कडील छायाचित्रात ४ अंक लिहिलेला व इतर छायाचित्रांत डोक्याला पट्टी*

*बांधलेला इसम म्हणजे मी दिसुन येत आहे. (सदर* ***<u>छायाचित्रांना ओळखीकरीता एकत्रीतपणे वस्तु – अ देण्यात</u>*** *देण्यात येते). हे मला आता आठवत नाही की, आरोपीने मला व गणेश याला कुदळीने मारहान केल्यामुळे उपचारासाठी मी सरकारी दवाखान्यात गेलो होतो. हे मला माहिती नाही की, गणेश याला जास्त दुखापत झाली असल्यामुळे त्याला रत्नागिरी येथील 'चिरायु, हॉस्पीटल' येथे भरती करण्यात आले होते.*

०५. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाबाहेर तडजोड झाल्यामुळे आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञा श्रीमती यु. पी. चव्हाण यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.12.19 17:36:07 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,
जि. रत्नागिरी.

दिनांक १९.१२.२०२५
स्थळः देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 19/12/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 19/12/2025 |
| Evidence uploaded on | :- | 19/12/2025 |